# कारणे

गुण क्र. १ :- उभय पक्षांच्या तक्रार व खुलासा दाखल कलेले पत्र व सर्कुलर, विद्यूत कायदा २००३ मधील भाग १२ व १४, कलम १२६ मुल्याकंन, कलम १२७ (१ ते ६) Appeal to Appellate Authority, महाराष्ट्र विद्यूत नियामक आयोग (विद्यूत पुरवठा संहिता आणि पुरवठ्याच्या इतर अटी) विधीनियम २००५ मधील कलम १५.४.१ व Circular No. २२४ Maharashtra Electricity Regulatory Commission ( Standards of Performance of Distribution Licensees, Period for giving Supply and Determination of Compensation) Regulations, २०१४ Implementation thereof. मधील १० मधील च्या तरतुदी लक्षात घेऊन मान्य बाबींचा उल्लेख खालील प्रमाणे आहे.

१) गैरअर्जदार यांनी अर्जदाराच्या सप्टेंबर २०१७ च्या बिला पोटी जम्प झालेले ६२२ युनिटचे बिल मागील नोव्हेंबर २०१६ ते सप्टेंबर २०१७ पर्यंतच्या महिन्यामध्ये विभागणी करुन दिले आहे. कारण ऑक्टोबर २०१६ ते ऑगष्ट २०१७ या काळात दर महा ८८,९,७,४,१४,२२,१७४,१७२,४०,३८,व १७ युनीटचे बिले गेली. ग्राहकाचा सरासरी वापर अर्जाप्रमाणे ३८५/११=३५ ऐवजी ५८५/११=५३ युनीट आहे. त्यास ऑक्टोबर, नोव्हेंबर व डिसेंबर २०१७ मध्ये अनुक्रमे ९२,२१,व १४ युनिटचे बिल गेलेले आहे. तसेच सहा.अभियंता शाखा क्र.८ लातूर यांच्या दि. ०९.१०.२०१७ च्या स्थळ तपासणी अहवालातील जोडभार १००३.५ Watt असुन त्यामध्ये एक पाण्याच्या बोअर वरील मोटर आहे.

२) गैरअर्जदार यांनी अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण मंचाच्या दि. ०४.०१.२०१८ च्या आदेशानुसार अर्जदाराचा मिटर हा महावितरण कडील योग्यत्या चाचणी विभागाकडून दि.१३.०३.२०१८ तपासणी करण्यात आला असुन तो सुस्थितीत आहे असे दर्शविले आहे त्यामुळे तो ग्राह्य धरणे आवश्यक आहे. ग्राहकाचा मीटर हा Rolex कंपनीचा असुन तो मुख्य अभियंता MMC प्रकाशगड बांद्रा यांचे पत्र क्र. ७७८ दि.०९.०३.२०१६. नुसार ताबडतोब बदलुन देण्यात यावे.

३) अर्जदार ग्राहकाचे सप्टेंबर २०१७ चे ६२२ युनीटचे बिल हे समान विभाणी करुन प्रचलीत संगणक प्रणाली नुसार दुरुस्त केले असुन रु.३८१०.४४/- इतके बिल कमी करुन दिले आहे. ग्राहकाचा जोडभार १००३.५ watt पाहता ते योग्य व बरोबर आहे.